# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (पुणे मेट्रो रेल प्रकल्प )

---

## महिला दिनानिमित्त विशेष उपक्रम!
## ८ मार्च रोजी ८ स्थानकांवर सर्व संचलन महिला कर्मचाऱ्यांच्या हाती:



आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून पुणे मेट्रोने एक विशेष आणि स्तुत्य निर्णय घेतला आहे. उद्या, ८ मार्च २०२६ रोजी पुणे मेट्रोच्या ८ प्रमुख स्थानकांचे संपूर्ण संचलन (operations) केवळ महिला कर्मचाऱ्यांमार्फतच केले जाईल. या निर्णयाद्वारे मेट्रो प्रशासनाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक पाऊल टाकत महिलांचे महत्त्व आणि कर्तृत्व अधोरेखित केले आहे.

उद्या पुणे मेट्रोच्या दोन्ही मार्गिकांवरील प्रत्येकी ४ स्थानकांवर सर्वच महत्त्वाच्या जबाबदाऱ्या महिला कर्मचारी यशस्वीरित्या सांभाळताना दिसतील. ही ८ स्थानके खालीलप्रमाणे आहेत:
मार्गीका -१:
पिंपरी चिंचवड मनपा मेट्रो स्टेशन
संत तुकाराम नगर मेट्रो स्टेशन
नाशिक फाटा मेट्रो स्टेशन
शिवाजीनगर मेट्रो स्टेशन

मार्गीका -२:
एसएनडीटी कॉलेज मेट्रो स्टेशन
पीएमसी मेट्रो स्टेशन
रुबी हॉल क्लिनिक मेट्रो स्टेशन
रामवाडी मेट्रो स्टेशन

महिलांचे कर्तृत्व आणि त्यांच्याकडे असलेल्या विविध क्षमतांचा सन्मान करण्यासाठी पुणे मेट्रोने हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमातून महिलांचा आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच, यातून प्रवाशांना देखील एका वेगळ्या आणि प्रेरणादायी अनुभवाची संधी मिळेल.

महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक  श्री. श्रावण हर्डीकर यांनी या उपक्रमाबद्दल बोलताना सांगितले की, "महिला हे समाजाचा खरा आधारस्तंभ आहेत आणि त्यांचे सर्व क्षेत्रात योगदान अतुलनीय आहे. पुणे मेट्रोने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून या ८ स्थानकांचे संचलन महिला कर्मचाऱ्यांकडे सोपवून त्यांच्या कर्तृत्वाला अधोरेखित केल आहे. हे एक मोठे आणि महत्त्वाचे पाऊल आहे जे महिला सक्षमीकरणाला चालना देईल."

पुणे मेट्रो तर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सर्व महिलांना महिलादिनाच्या हार्दिक शुभेच्छा!.